**Covid-19**
**Top Most Priority**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
४) या कार्यालयाकडी सुधारीत आदेश १९७३ चे कलम १४४ (१) (४) क्र. जि.आ.व्य./करोना विषाणू/१५६/२०२० दि. २२/०३८/२०२०
५) भारत सरकार,गृह मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील आदेश क्र. ४०-३/२०२० डी. दि. २४/०३/२०२०

*************************************************************************

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/१८० /२०२०.
पुणे, दिनांक :- २५/०३/२०२०.

**विषय :- कोरोना विषाणू (कोव्हीड १९)चा प्रादूर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपायायोजना करणेसाठी सर्व उपविभागीय अधिकारी यांना Incident Commander म्हणून नेमणूक करणेबाबत**

**आदेश**

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

पुणे जिल्हयामध्ये करोना विषाणू (कोव्हीड १९) या संसर्गजन्य आजार पसरला असून त्याचा प्रादूर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच भारत सरकार,गृह मंत्रालय यांचेकडील आदेश क्र. ४०-३/२०२० डी. दि. २४/०३/२०२० यांचेकडील सुचनेनुसार कोरोना विषाणू (कोव्हीड १९)चा प्रादूर्भाव राखणेसाठी प्रतिबंधात्मक उपायायोजना करणेसाठी **कार्यकारी दंडाधिकारी यांना Incident Commander** म्हणून नेमणूक करणेबाबत कळविणेत आले आहे.

**त्या अर्थी मी नवल किशोर राम, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, पुणे** जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 व भारत सरकार,गृह मंत्रालय यांचेकडील आदेश क्र. ४०-३/२०२० डी. दि. २४/०३/२०२० अधिसुचना अन्वये खालील **सर्व उपविभागीय अधिकारी यांना त्याच्या अधिनस्त असणाऱ्या क्षेत्रासाठी Incident Commander म्हणून नेमणूक करणेत येत आहे.**

| अ.क्र. | उपविभागीय अधिकारी यांचे नाव | क्षेत्र | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | श्री. जितेंद्र डुडी सहाय्यक जिल्हाधिकारी | जुन्नर व आंबेगाव | ९७८३८०२०२० |
| २ | श्री. संतोष देशमुख, उपविभागीय अधिकारी | पुणे शहर व शिरुर | ८२७५००६९४५ |
| ३ | श्री. संदेश शिर्के, उपविभागीय अधिकारी | मावळ व मुळशी | ९९२२४४८०८० |
| ४ | श्री. संजेय तेली, उपविभागीय अधिकारी | खेड | ९४०५५८३७९९ |
| ५ | श्री. सचिन बारवकर, उपविभागीय अधिकारी | हवेली | ९८२२८७३३३३ |
| ६ | श्री. दादासाहेब कांबळे, उपविभागीय अधिकारी | बारामती व इंदापूर | ८९७५५२४१९९ |
| ७ | श्री. प्रमोद गावकवाड, उपविभागीय अधिकारी | दौंड व पुरंदर | ९८६०२५८९३२ |
| ८ | श्री. राजेंद्र जाधव, उपविभागीय अधिकारी | भोर व वेल्हे | ९८५०११४४४७ |

Scanned by CamScanner

**वरील वाचा क्र. ५ अन्वये** आदेशीत केलेल्या उपाययोजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची जबाबदारी आपल्या कार्यक्षेत्रात आपली राहील. (सोबत अधिसुचना जोडली आहे) तसेच केंद्र सरकार,राज्य सरकार, विभागीय आयुक्त व जिल्हा स्तरावरुन देणेत आलेले आदेश व सुचनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच आपल्या कार्यक्षेत्रातील अत्यावश्यक सेवा सुरु ठेवणेसाठी पासेस तसेच आवश्यक ती उपाययोजना करणेत यावी. याअनुषंगाने करणेत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा नियंत्रण कक्षास दररोज सादर करावा.

या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ याव्दारे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे**

प्रति,

1) मा. केंद्रीय गृह सचिव, भारत सरकार नवी दिल्ली
2) मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
3) मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
4) मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
5) मा. आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका
6) मा. पोलीस आयुक्त पुणे शहर व पिंपरी चिंचवड, पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
7) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,
8) सर्व उपविभागीय अधिकारी

Scanned by CamScanner